# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

क्रमांक : संगाबाअवि/८/सी-४१ /२०२३.
दिनांक : ०७ / ०१ /२०२३.

**शैक्षणिक सत्र २०२३-२४ या वर्षाकरीता नवीन महाविद्यालये, अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडया सुरु करण्याकरीता अर्ज मागविण्याबाबत....**

सर्व सामान्यांच्या माहितीकरिता सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ कायदा २०१६ कलम १०९ (३) (a) तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ दिनांक २४ नोव्हेंबर, २०२२ रोजी प्रथम प्रसिध्द केलेला अधिनियमानुसार शैक्षणिक सत्र २०२३-२४ या वर्षाकरीता नवीन महाविद्यालये, अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडया सुरु करण्याबाबतचे अर्ज संस्थांनी / महाविद्यालयांनी विहीत नमुन्यात **दिनांक १५ जानेवारी, २०२३ रोजी किंवा त्यापुर्वी** विद्यापीठात सादर करावयाचे आहेत. त्यानंतर आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

शासन निर्णय क्र.एनजीसी-२०१७/(२९/१७)/मशि-४ दि. १५ सप्टेंबर, २०१७ नुसार शैक्षणिक सत्र २०२३-२४ या वर्षाकरीता नवीन महाविद्यालये (व्यवसायिक व पारंपारिक) आणि क्र.एनजीसी-२०१७/(२०८/१७)/मशि-४, दि. १३ सप्टेंबर, २०१७ नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडयांना मंजुरी देण्यासाठी कार्यपध्दती विहीत केलेली आहे. प्राचार्य व संस्थाचालकांनी सदर शासन निर्णय काळजीपुर्वक वाचून नमूद केलेल्या अटींची पुर्तता करावी.

नवीन महाविद्यालये, नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडयांचे अर्ज व बृहत आराखडयाची प्रत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या पतसंस्थेमध्ये दिनांक ०९ जानेवारी, २०२३ पासून विहीत शुल्काचा भरणा केल्यावर मिळेल.

बृहत आराखडयामध्ये दर्शविलेल्या ठिकाणासाठीच नवीन महाविद्यालये, अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडया इत्यादीबाबतचे अर्ज स्विकारल्या जातील, बृहत आराखडयामध्ये स्थान निश्चित केलेल्या ठिकाणा शिवाय इतर ठिकाणी नमूद केलेले अर्ज स्विकारल्या जाणार नाहीत. संस्थाप्रमुख/प्राचार्यांनी बृहत आराखडयामध्ये नमूद ठिकाणी दर्शविलेल्या नवीन महाविद्यालय, अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडयांचे अर्ज विहीत शुल्कासह सादर करावे. त्याव्यतिरिक्त अर्ज स्विकारले जाणार नाहीत, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

संस्था चालकांनी नवीन महाविद्यालयाचे अर्ज Offline पध्दतीने भरावयाचे आहे. भरलेला परीपूर्ण अर्ज सर्व आवश्यक सहपत्रांसह साक्षांकीत करुन ६ प्रतीत विद्यापीठाकडे सादर करावेत. शासन निर्णयानुसार संस्थेमध्ये असलेल्या सोयी-सुविधा व कर्मचारी / शिक्षक यांच्या विषयाचे Video चित्रिकरण करावे व प्रस्तावासह सादर करावे. सदर प्रस्ताव DV-TTSurekh Font मध्येच शासनास सादर करावयाचे आहेत. अर्ज भरण्यासंदर्भात सविस्तर माहिती विद्यापीठ वेबसाईट www.sgbau.ac.in वर News and Announcements मध्ये दिलेली आहे.

उपरोक्त नमूद केल्यानुसार, नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडयांचे अर्ज पतसंस्थेमधून प्राप्त करुन घ्यावे व ते पूर्णपणे भरुन सर्व आवश्यक सहपत्रांसह साक्षांकीत करुन ६ प्रतीत विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर करावेत.

महाराष्ट्र शासन पत्र क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.७०/विशि-५, दिनांक ७ जानेवारी, २०२३ अन्वये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा बृहत आराखडा मंजुर केलेला असून, बृहत आराखड्यामध्ये नमुद बिंदुच्या ठिकाणाकरीता अर्ज स्विकारण्याबाबत आदेश दिलेले आहे. त्यानुसारच पात्र अर्जाचा विचार केला जाईल.

संस्थेने/महाविद्यालयाने सादर केलेल्या अर्जामध्ये कोणत्याही प्रकारच्या तृट्या आढळून आल्यास संबंधित संस्थेने/ महाविद्यालयाने सादर केलेला अर्ज शासनाकडे शिफारस न करता संबंधितांना परत पाठविण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**टिप**:- १) उपरोक्त जाहिरातीनुसार अर्जासोबत भरावयाचे विहीत शुल्क Direction No. 19 of 2022, Dt. 10.03.2022 व कार्यालयीन सुचना क्रमांक ३०, संगाबाअवि/८/२/एफ-५६६/२०१८, दिनांक ०६.०८.२०१८ नुसार **वित्त व लेखा अधिकारी,** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्या नांवे धनाकर्ष काढुन विद्यापीठ खाती जमा करण्यात यावे.

२) नवीन महाविद्यालयाकरीता अर्ज भरतांना अडचणी आल्यास मो.नं. ९०११०९०४४७/९४०३३४२५६१ या वर संपर्क साधावा.

**कुलसचिव**
संत गाडगे बाबा
अमरावती विद्यापीठ.

File-New College 2023-24